**साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.) मुंबई यास सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाकरीता व्यवस्थापकीय अनुदान मंजूर करण्याबाबत...**

**महाराष्ट्र शासन**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन निर्णय, क्रमांक- एलएएस-२०१५/प्र.क्र.१९०/महामंडळे
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक :- ३१ मार्च , २०१६.

**वाचा :-** १) वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थसंकल्प, दि.१७ एप्रनि.२०१५
२) शासन निर्णय,समक्रमांक दि.२९ एप्रिल, २०१५
३) शासन ज्ञापन, क्र. बीजीटी-२०१५/प्र.क्र.८६/अर्थसंकल्प,दि.१२ ऑगस्ट, २०१५.
४) शासन निर्णय, समक्रमांक दि.३० आक्टोबर २०१५
५) शासन परिपत्रक, वित्त विभाग. क्र अर्थसं-२०१५/प्र.क्र.८५/अर्थ-३, दि.१२.०१.२०१६.
६) शासन निर्णय, समक्रमांक, दि.३१ मार्च, २०१६

**शासन निर्णय** :- साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.) मुंबई या महामंडळास संदर्भ क्र.६ अन्वये ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) साठी ७०% मर्यादेत रु.९,६८,८००/-(अक्षरी रुपये नऊ लक्ष अडुसष्ट हजार आठशे फक्त) - एवढे व्यवस्थापकीय अनुदान वितरीत करण्यात आले आहे. आता सुधारीत अंदाजानुसार ३१ सहायक अनुदाने (वेतनेतर) यासाठी उर्वरित ३०% रक्कम रु.४,१५,२००/- (अक्षरी रुपये चार लक्ष पंधरा हजार दोनशे फक्त) एवढे व्यवस्थापकीय अनुदान वितरीत करण्यास शासन मान्यता देत आहे.

२. वरील अनुदानाबाबत सह सचिव/ उप सचिव (महामंडळे), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई हे नियंत्रक अधिकारी राहतील. सदर अनुदानाची रक्कम पुढील कार्यवाही करिता प्रादेशिक उपायुक्त, मुंबई समाजकल्याण, नवी मुंबई यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहे. त्यांना सदर अनुदान म.को.नि.४४ मधील नमुन्यातील देयकान्वये साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांस संवितरित करण्याचे अधिकार देण्यात येत आहेत.

३. या बाबींवरील खर्च मागणी क्रमांक एन-३, २२२५-अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती व इतर मागासवर्ग यांचे कल्याण, ०१ अनुसूचीत जातीचे कल्याण, ८०० इतर खर्च (१०) (०१) लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (मर्या.), मुंबई यास सहायक अनुदान (२२२५ २३ १७) ३१ सहायक अनुदाने (वेतनेत्तर) या लेखाशिर्षाखाली खर्ची टाकून सन २०१५-२०१६ या आर्थिक वर्षाच्या मंजूर तरतुदीतून भागविण्यात यावा.

४. हा शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.१६१/१५/साउ, दि.०८.१२.२०१५ नुसार निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( चंद्रकांत ह.वडे )**
**कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन**

प्रति,
आयुक्त, समाजकल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सह सचिव/उप सचिव (महामंडळे), सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय. मुंबई-३२
प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण विभाग, नवी मुंबई (दोन प्रती)
व्यवस्थापकीय संचालक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ (म.) मुंबई

C:\Users\admin\Desktop\व्यवस्थापकीय अनुदान\व्यवस्थापकीय अनुदान-साठे महामंडळ.docx

Scanned by CamScanner

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परिक्षा) महाराष्ट्र १ /२, मुंबई
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई, / जिल्हा कोषागार अधिकारी, मुंबई,/ठाणे.
निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
अप्पर कोषागार अधिकारी, कोकणभवन, नवी मुंबई.
वित्त विभाग, (का व्यय १४/अर्थोपाय/अर्थसंकल्प-३/साउ), मंत्रालय, मुंबई.
सहसंचालक, लेखा व कोषागारे, संगणक कक्ष, नवीन प्रशासन भवन, ५वा मजला, मुंबई,
कार्यासन-अर्थसंकल्प, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई ३२.
निवड नस्ती का-महामंडळे.

Scanned by CamScanner